स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
## Pune Metropolitan Region Development Authority, Pune

नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे – 411 044

New administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi,Pune – 411 044

PUNEMETROPOLI

क्र. पुमप्रविप्रा/लेखा व वित्त/सनदी लेखापाल/अंतर्गत लेखापरिक्षण/ 529 दि. 17/07/2026

### दरपत्रक मागणी नोटीस

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाकडील आर्थिक वर्ष २०२६-२७ करिता **अंतर्गत लेखापरिक्षणासाठी सनदी लेखापाल** यांची नियुक्ती करावयाची असून त्यांचे मार्फत करावयाच्या कामकाजाबाबतचा (Scope of Work) तपशील खाली नमूद करण्यात आलेला आहे. सदर काम करणेकरिता इच्छुक असलेल्या संस्थांनी (Firm) सिलबंद दरपत्रके लेखा व वित्त विभागास दि. २३.०७.२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा रितीने पाठविण्यात यावीत. दि. २३.०७.२०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेले सिलबंद लिफाफे / दरपत्रके यांचा विचार केला जाणार नाही.

तसेच सदर कामाकरिता सनदी लेखापाल यांची नियुक्ती ३ वर्षे कालावधीकरिता करण्यात येणार असून प्रथम एक वर्ष नियुक्ती देण्यात येईल व तदनंतर १-१ वर्ष अशी मुदतवाढ कामाची स्थिती बघून देण्यात येईल.

सदरचे सिलबंद लिफाफे दि. २४.०७.२०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता वित्तीय नियंत्रक, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी व लेखाधिकारी यांचे समावेत उघडण्यात येतील.

### अंतर्गत लेखापरीक्षणासाठी सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे

| Sr. No. | Particular | Amount |
|---|---|---|
| 1. | <u>Internal Audit and Audit of Balance Sheet</u><br><br>Scope of Work:<br><br>• Verification of Statutory Deductions of Payment Vouchers in Tally:<br>  o Cross-checking compliance with TDS, GST, EPF, ESI, and other statutory deductions as per applicable laws.<br>• Accounting Entries Verification in Tally:<br>  o Scrutiny of journal entries, ledger postings, and compliance with applicable accounting standards.<br>  o Ensuring accurate classification of expenses and revenue in the books of accounts.<br>• Bank Reconciliation Verification:<br>  o Monthly reconciliation of bank statements with books of accounts.<br>  o Identifying discrepancies and providing necessary adjustments.<br>• Verification of Statutory returns :<br>Verification of statutory returns files like GST, TDS, Professional tax etc. | |
| 2. | <u>Annual Government Reporting of Receipt and Payment Account Scope of Work:</u><br><br>• Compilation and preparation of the Receipt & Payment Account in the prescribed government format.<br>• Ensuring accuracy and completeness of financial data as per government reporting standards.<br>• Coordination with PMRDA's finance team for required documentation and clarifications.<br>• Filing and submitting reports to the relevant government authorities per statutory deadlines. | |

अटी व शर्ती :-

१. दर पत्रकातील दर GST शिवाय दर्शविण्यात यावे.
२. दरपत्रकामधील नमूद रकमेशिवाय कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही.
३. कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर कार्यालयास सादर करावे.
४. कामाची रक्कम काम समाधानकारक रित्या पूर्ण झालेनंतर अदा करण्यात येईल.
५. संस्थेच्या / पुरवठादाराचे काम असमाधानकारक आढळल्यास देयक अदा करण्यात येणार नाही.
६. दरपत्रके मंजूर / ना मंजूर करण्याचे अधिकार कार्यालयाने राखून ठेवण्यात आलेले आहेत.
७. दरपत्रके संस्थेच्या पत्रशीर्षावर (Letterhead) असावीत. तसेच सदर दरपत्रकावर सनदी लेखापाल यांची स्वाक्षरी शिक्क्यासह असणे बंधनकारक आहे.
८. संस्थेच्या छापील दरपत्रकावर जर काही नियम व अटी असतील तर सदरचे नियम व अटी हे कार्यालय स्वीकारणार नाही.
९. विभागाकडून देण्यात येणारे सर्व लेखे हे गोपनीय स्वरुपाची असून सदर गोपनियतेचा भंग झाल्यास संबंधित संस्था यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.
१०. सर्व कार्यालयीन माहिती गोपनीय ठेवण्याची जबाबदारी संबंधित सनदी लेखापाल यांची असेल.
११. दरपत्रके सादर करताना खाली नमूद कागदपत्रे सादर करण्यात यावीत.
    - सनदी लेखापाल यांचे नोंदणी प्रमाणपत्र
    - GST नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास)
    - पॅन कार्ड ची साक्षांकित प्रत
    - शासकीय / निमशासकीय कार्यालय, केंद्र / राज्य शासन अंगीकृत संस्था, महामंडळे व प्राधिकरणे यांचेकडे काम केल्याचे किमान मागील ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र. (कार्यारंभ आदेश गृहित धरण्यात येणार नाही.)
१२. सदर दरपत्रके कारणाशिवाय रद्द करण्याचे सर्व अधिकार आरक्षित आहेत.
१३. दरपत्रके हे तांत्रिक व आर्थिक दराबाबत स्वतंत्र सिलबंद लिफाफे (द्विलिफाफे) सादर करावेत.
१४. सिलबंद दरपत्रकाचे लिफाफे सादर करण्याचे ठिकाण :- लेखाधिकारी, लेखा व वित्त विभाग, ५ वा मजला, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे ४११ ०४४.

(जितेंद्र कोळंबे)
**वित्तीय नियंत्रक,**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे**

प्रति.
कार्यालयीन नोटीस बोर्ड.
पुणे महानगर विकास प्राधिकरण पुणे.